| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.३०१५/२०१७ |
| सरकार –वि– योगेश |
| निशाणी क्र. २१ |

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची शपथेवर जवाब

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | विजय मंगीराम हरणखेडे, |
| **वय** | : | ४८ वर्षे, |
| **धंदा** | : | व्यवसाय |
| **राहणार** | : | जयताळा, नागपूर. |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.चिंचोळकर यांचेमार्फत–**

१. दि.२६.०७.२०१७ रोजी माझा मित्र स्वराज टेंबे (फिर्यादी) याने त्याच्याकडे चोरी झाल्याने पोलिस स्टेशन अजनी येथे बोलाविले होते. तिथे पोलिसांनी काही कागदपत्रांवर माझी सही घेतली होती. मला आता कबूली जबाब व जप्ती पंचनामा दि.२६.०७.२०१७ दाखविण्यात आले. त्यावर पंच क्र.१ म्हणून माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहयांना **निशाणी पी–१ व पी–२** देण्यात येत आहे. असे काही घडले नाही की, मी पोलिस स्टेशन अजनी येथे दि.२६.०७.२०१७ रोजी गेलो असता तिथे आरोपी योगेश पाटील पोलिसांच्या ताब्यात होता व त्याने माझ्यासमक्ष गून्हयाची कबूली देण्याची ईच्छा दर्शविली व पोलिसांनी त्याचा कबूली जबाब नोंदवून घेतला. असेही काही घडले नाही की, पोलिसांनी आरोपीने दाखविल्यानूसार साई अपार्टमेन्ट, सूजाता बौद्ध विहार जवळ, नागपूर येथून एम लॅपटॉप व तीन मोबाईल माझ्यासमक्ष जप्त केले.

**साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपास घेण्याची विनंती केली, परवानगी देण्यात आली. उलटतपास सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे सुरू–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६.०७.२०१७ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणून अजनी पोलिस स्टेशन येथे बोलावले व तेथे त्यांनी माझ्यासमक्ष आरोपी योगेश पाटील याचा कबूली जबाब नोंदवून घेतला व त्यावर माझी व आरोपीची सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी आरोपीने दाखविल्यानूसार साई अपार्टमेन्ट, सूजाता बौद्ध विहार जवळ, नागपूर येथून एम लॅपटॉप व तीन मोबाईल माझ्यासमक्ष जप्त केले व जप्ती पंचनामा तयार केला, त्यातील मजकूर बरोबर असल्याने मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी माझ्यासोबत दूसरा पंच देवेंद्र चौबे हा हजर होता व त्याने सदर कागदपत्रांवर सही केली. देवेंद्र चौबे हा माझ्यासोबत व्यवसाय करत असल्यामूळे सदर कागदपत्रांवरील त्याची सही मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. मी आरोपी योगेश पाटील यास ओळखत नाही.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींतर्फे ॲड. श्री. श्रीकांत निमजे यांच्या मार्फत–**

उलटतपास नाकारला.

माझे समक्ष,

श्रवणोत्तर स्वीकृत

ANAMIKA DEBASHISH BOSE
Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.04.23 15:33:52 +0530

**(अनामिका दे. बोस)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
**नागपूर.**

नागपूर
**दिनांक २३.०४.२०२६**